# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १५८

## सभावृत्तांत

दिनांक - २.०३.२०१० वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक २.३.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.जगदीश शंकर शेट्टी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
६. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
७. मा.सौ.सुलोचना बबन बढे
८. मा.सुमनताई मधुकर पवळे
९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
१०. मा.थोरात एकनाथ दादा
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत

याशिवाय मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.जगदीश शेट्टी अनुमोदक :-मा.सुरदास गायकवाड

मंगळवार दिनांक ९.३.२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

---

मा.सभापती :- मंगळवार दिनांक ९.३.२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

कार्यपत्रिका क्रमांक - १५८

सभावृत्तांत

(दि.२.३.१० ची तहकूब सभा)

दिनांक - ९.३.२०१० वेळ - दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.२.३.१० ची तहकूब सभा मंगळवार दिनांक ९.३.२०१० रोजी दुपारी १.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
६. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
७. मा.सौ.सुलोचना बबन बढे
८. मा.सुमनताई मधुकर पवळे
९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
१०.मा.थोरात एकनाथ दादा
११.मा.तानाजी विठ्ठल खाडे
१२.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१३.मा.गावडे जयश्री वसंत
१४.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त,मा.देशमुख,मा.झुरे,मा.गायकवाड,मा.गावडे, मा.भोसेकर,मा.मुंढे,मा.फडणीस,मा.कारचे-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव, मा.चव्हाण-अति.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता,मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.ढगे,मा.बनकर,मा.कुदळे,मा.थोरात,मा.चिंचवडे,मा.सवणे,मा.दुधेकर,मा.जाधव, मा.चव्हाण-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पोमण-संगणक अधिकारी, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सूचक :- मा.राजेंद्र साळुंके                    अनुमोदक :-मा.जितेंद्र ननावरे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ.श्रीपती शास्त्री, ज्येष्ठ राजकीय संघटक नानाजी देशमुख, ज्येष्ठ राजकीय व्यक्तिमत्व मधुकर सरपोतदार, माजी नगरसदस्या शकुंतला भाट यांचे पती व माजी नगरसदस्य मूरचंद भाट यांचे चिरंजीव राजेश मूरचंद भाट यांचे दु:खद निधन झाले असल्याने त्यांना श्रद्धांजली वाहून बुधवार दिनांक १७.३.२०१० रोजी दुपारी १.३० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.)

मा.सभापती :- बुधवार दिनांक १७.३.२०१० रोजी दुपारी १.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १५८

सभावृत्तांत

(दि.२.३.१०,९.३.२०१० ची तहकूब सभा)

दिनांक - १७.०३.२०१०  वेळ - दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.९.३.१० ची तहकूब सभा बुधवार दिनांक १७.०३.२०१० रोजी दुपारी १.३० वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे - सभापती
२. मा.सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.रामदास तानाजी कुंभार
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सुमनताई मधुकर पवळे
७. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०.मा.तानाजी विठ्ठल खाडे
११.मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
१२.मा.गावडे जयश्री वसंत
१३.मा.सौ.वर्षा विलास मडीगेरी

याशिवाय मा.डुंबरे-अति.आयुक्त,मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.कारचे,मा.गावडे, मा.भोसेकर,मा.मुंढे,मा.फडणीस-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.चव्हाण-अति. शहर अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.पाटील-उपसंचालक नगररचना, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.लोंढे-मुख्यलेखापाल, मा.थोरात,मा.निकम,मा.ढगे,मा.बनकर,मा.कुदळे,मा.कपिले,मा.सवणे,मा.दुधेकर, मा.जाधव,मा.चव्हाण-कार्य.अभियंता,मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.),मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार,मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------------------

ठराव क्रमांक :- १०७५१ विषय क्रमांक :- १
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - आरोग्य
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जितेंद्र ननावरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आमु/४/कावि/१०८/१० दि.१८/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कचरा वाहतुक कामासाठी मजूर/कामगार यांची आवश्यकता असून सदरचे काम पुर्ण क्षमतेने होणेचे दृष्टीने मे.तिरूपती लेबर ॲन्ड सिक्युरिटी कॉन्ट्रक्टर, निगडी यांना अ व क तसेच मे.महालक्ष्मी स्वयं.सेवा सह.संस्था यांना ब व ड प्रभागाचे कामाकरिता प्रत्येकी २० या प्रमाणे ४० मजूर/कामगार थेट पध्दतीने करारनामा करून किमान वेतन दराने ६ महिने कालावधीसाठी मुदतवाढ/काम देण्यास व त्याकामी येणाऱ्या अंदाजे र.रू.११,०४,५५०/- [र.रू.अकरा लाख चार हजार पाचशे पन्नास] चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५२ विषय क्रमांक :- २
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - मुख्य लेखापरिक्षण
सुचक- मा.सुमनताई पवळे अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:- मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/१३१/१० दि.१७/२/१०

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५३ विषय क्रमांक :- ३
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा. जयश्री गावडे अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१/कावि/७७/१० दि.१८/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विद्युत विभागासाठी विविध लॅम्प साहित्य खरेदीकामी ई-नि.क्र.१०/५-०९/१० अन्वये लघुत्तम निविदाकार मे.ब्राईटशाईन असोसिएट्स, चिंचवड यांचे विविध लॅम्प (ॲटम १ ते २) साहित्याचे दर एकूण र.रू.५७,५२५/- [र.रू.सत्तावन्न हजार पाचशे पंचवीस] स्विकृत करून, करारनामा केलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५४ विषय क्रमांक :- ४
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - आरोग्य
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आ/८/कावि/१५४/०९ दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या आरोग्य मुख्यालयाकडे मनपाने खरेदी केलेल्या व जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत खरेदी झालेल्या ६० वाहनांची नोंदणी फी, विमा व वाहनांवर नोंदणी क्रमांक रंगविणे, मनपाचे नांव टाकणे इत्यादीसाठी र.रू.४८,०००/- [र.रू.आठ्ठेचाळीस हजार] चे खर्चास तसेच आगाऊ घेतलेले र.रू.४०,०००/- चे समायोजन करताना जादा खर्च र.रू.८,०००/- [र.रू.आठ हजार] आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे नांवे अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५५ विषय क्रमांक :- ५
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - भूमि आणि जिंदगी
सुचक- मा.तानाजी खाडे अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/५/कावि/८७/१० दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरीनगर भाजी मंडई लगत बांधलेले २२ ओटे पैकी रिक्त ओटे वितरणाकामी प्राप्त सर्वोच्च दराच्या निविदा प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे असून त्यातील दर हे मनपा दरापेक्षा जास्त असल्याने ते स्वीकृत करून निविदा अटी/शर्तीनुसार मनपा करेत्तर समिती शिफारशीनुसार दुसरे वर्षापासून प्रत्येक वर्षी भाडेदरात १२.५ % वाढ करून निविदा स्वीकृत करून ५ वर्षाचे भाडेकराराने देण्याचे प्रस्तावीत असल्याने प्रपत्र अ मधील सर्वोच्च दराच्या निविदा स्वीकृतीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५६ विषय क्रमांक :- ६
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/नि/कावि/१२०/१० दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस (पुणे) प्रा.ली.यांचेकडून प्रस्तावात नमुद प्रमाणे प्रिंटर्सचे टोनर्स व कारट्रेजेस रिफीलिंगचे दर आलेले असून त्यांचेकडून सदरचे काम करून घेणेसाठी र.रू. ७१,२००/- [र.रू.एक्काहत्तर हजार दोनशे] खर्च येणार असून त्यासाठी त्यांनी करारनामा करून दिला असल्याने सदरच्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५७ विषय क्रमांक :- ७
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.वर्षा मडीगेरी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/१०/कावि/९९/१० दि.२०/२/१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणून मनपास आवश्यक वेगवेगळ्या प्लेटच्या एकूण ५० नग बॅटऱ्या मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि. या उत्पादित कंपनीकडून थेट खरेदी करणेस व येणाऱ्या र.रू.१,८९,९४३/- [र.रू.एक लाख एकोणनव्वद हजार नऊशे त्रेचाळीस] (जकात करासह) खर्चास व सदरची रक्कम मे.एक्साईड इंडस्ट्रीज लि. यांना आगाऊ स्वरूपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५८ विषय क्रमांक :- ८
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - क प्रभाग, विद्युत
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.कप्र/वि/९९/१० दि.१५/२/१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

क प्रभाग विद्युत अंतर्गत नेहरूनगर मधील जय संतोषीमाता चौक ते ज्योती इंग्लिश स्कुल व अण्णासाहेब मगर स्टेडीयम ते उदयम नगर येथील २२ kv उच्चदाब हलवुन भुमिगत केबल टाकणेचे कामाचे १.३ % पर्यवेक्षण शुल्क र.रू.१,१०,४००/- [र.रू.एक लाख दहा हजार चारशे ] म.रा.वि.वि.कंपनी लिमीटेड यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७५९ विषय क्रमांक :- ९
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - दुरसंचार
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दुरसंचार/४९/१० दि.२२/२/१०
विषय - जकात विभागाकरिता कार्यालयीन कामकाजासाठी मोबाईल सुविधा पुरविणेबाबत..

विषय क्रमांक ९ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६० विषय क्रमांक :- १०
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग, विद्युत
सुचक- मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.जयश्री गावडे
संदर्भ:- मा.विकास अभियंता यांचे जावक क्र.अप्र/वि/आ/६८/१० दि.२३/२/१०

मा.विकास अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.२४ KSB चौक ते टेल्को सबस्टेशन पर्यंतच्या रस्ता रूंदीकरणात अडथळा करणारे उच्चदाब वीज वाहिनी हलविणे या कामाचे १.३ % सुपरव्हिजन चार्जेस र.रू.१,०२,१६०/- [र.रू. एक लाख दोन हजार एकशे साठ] म.रा.वि.वि.कं.स अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६१ विषय क्रमांक :- ११
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.सुमनताई पवळे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२३२/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-२०१० मधील अ.क्र.२२ अन्वये, प्रभाग क्र.५३ मधील मनपा मालकीचे इमारतीमध्ये रंगकाम करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस (नि.र.रू.४,६६,३४९/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार तीनशे एकोणपन्नास] पेक्षा २७.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६२ विषय क्रमांक :- १२
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.प्रभाकर वाघेरे अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२३४/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-२०१० मधील अ.क्र.२३ अन्वये, वॉर्ड क्र.३७ मध्ये मनपा शाळेची स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.शिवम एंटरप्रायझेस (नि.र.रू.४,६५,५४०/- [र.रू.चार लाख पासष्ट हजार पाचशे चाळीस] पेक्षा २७.०० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६३ विषय क्रमांक :- १३
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.एकनाथ थोरात अनुमोदक - मा.प्रेमकुमार नायर
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२३५/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/०९-१० मधील अ.क्र.३० अन्वये, वॉर्ड क्र.४१ काळभोरनगर मधील आकुर्डी खंडोबामाळ ते दळवीनगर रेल्वे ओव्हरब्रीज इ.३१ मी. रस्त्याच्या साईडपट्ट्यांचे व इतर अंतर्गत रस्त्याचे रूंदीकरण करून खडीकरण व डांबरीकरण करणेकामी मे.पी.ए.कृपलानी (नि.र.रू.४,६५,८४०/- [र.रू.चार लाख पासष्ट हजार आठशे चाळीस] पेक्षा ३१.३२ % कमी) या

ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६४ विषय क्रमांक :- १४
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.राजेंद्र साळुंके अनुमोदक - मा.एकनाथ थोरात
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२३७/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.२/२००९-२०१० मधील अ.क्र.४० अन्वये, प्राधिकरण प्रभाग क्र.५० मधील से.नं. २७ अ मधील मनपा इमारतीचे रंगकाम करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.एस.एम.कंन्स्ट्रक्शन (नि.र.रू. ३,७३,४९३/- [र.रू.तीन लाख त्र्याहत्तर हजार चारशे त्र्यान्नव] पेक्षा १८.२२ % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६५ विषय क्रमांक :- १५
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.मनोहर पवार अनुमोदक - मा.प्रभाकर वाघेरे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२३९/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.४३ अन्वये, वॉर्ड क्र.३७ मध्ये मनपा शाळांची दुरुस्ती व रंगकाम करणेकामी मे.एन.एन.शिंगाडे (नि.र.रू. ४,६६,३४९/- [र.रू.चार लाख सहासष्ट हजार तीनशे एकोणपन्नास] पेक्षा २५.५० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६६ विषय क्रमांक :- १६
दिनांक- १७.०३.२०१० विभाग - अ प्रभाग
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.तानाजी खाडे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जावक क्र.अप्र/कावि/२४१/१० दि.२२/२/१०

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या अ प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.१/२००९-२०१० मधील अ.क्र.५६ अन्वये, प्राधिकरण वॉर्ड क्र.५० मधील से.क्र.२४ व २७ अ मधील विविध मनपा इमारतीचे रंगकाम करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी मे.ओमेगा एंटरप्रायझेस (नि.र.रू.३,७३,४९३/- [र.रू.तीन लाख त्र्याहत्तर हजार चारशे त्र्यान्नव] पेक्षा ३२.४० % कमी) या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६७ विषय क्रमांक :- १७
दिनांक- १७.०३.२०१० विभाग-फॅमिली वेलफेअर सोसायटी
सुचक- मा.वर्षा मडीगेरी अनुमोदक - मा.राजेंद्र साळुंके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आर.सी.एच./आस्था/कावि/६३/१० दि.२४/२/१०
विषय - आर.सी.एच.कार्यक्रम अधिकारी या पदावर एकत्रित मानधनावर नियुक्तीबाबत...

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

ठराव क्रमांक :- १०७६८ विषय क्रमांक :- १८
दिनांक- १७.०३.२०१० विभाग-वैद्यकीय
सुचक- मा.रामदास कुंभार अनुमोदक - मा.मनोहर पवार
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.RCH/आस्था/कावि/६४/१० दि.२४/२/१०
विषय - आर.सी.एच.कार्यक्रमांतर्गत करार तत्वावर क्षेत्रिय कर्मचा-यांची पदे भरणेबाबत..

विषय क्रमांक १८ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत कृष्णराव शितोळे)
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/३९४/२०१०
दिनांक - १८/ ३ /२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.